**L. A. BILL No. XXV OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC TRUSTS ACT.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

१९५० चा २९.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

(शा.म.मु.) एचबी २९७८—१ (१०४०-३-२०२५)

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ४१अअ ची सुधारणा.

१९५०चा २९.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ४१अअ मध्ये, पोट-कलम (४) मधील, खंड (अ) मध्ये, उप-खंड (चार) नंतर, पुढील उप-खंड दाखल करण्यात येतील :–

"(पाच) राज्य शासनाने, कलम ५८ अन्वये सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधीमध्ये वार्षिक अंशदानाचे प्रदान करण्यातून सूट दिलेली आहे ;

(सहा) राज्य शासनाकडून, केंद्र सरकारकडून किंवा त्यांच्या उपक्रमांकडून किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडून, वीज आकार, पाणीपट्टी, नगरपालिका किंवा स्थानिक संस्था कर यांचे प्रदान करण्यातून सवलत किंवा सूट किंवा शिथिलता देण्यात आली आहे, अथवा इतर कोणतीही आर्थिक सवलत किंवा सूट किंवा शिथिलता देण्यात आली आहे ;".

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ५८ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५८ मध्ये, पोट-कलम (२) मधील, "दुर्भिक्ष, अवर्षण, पूर, आग किंवा इतर नैसर्गिक आपत्ती यांमुळे ओढवलेल्या आपत्तीच्या निवारणासाठीच केवळ असतील त्या विश्वस्तव्यवस्थांना" या मजकुरानंतर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

"किंवा ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, रुग्णालय (कोणतेही शुश्रूषालय किंवा प्रसूतिगृह यांसह), दवाखाना किंवा कलम ४१अअ मध्ये "वैद्यकीय केंद्र" म्हणून निर्दिष्ट केलेले वैद्यकीय सहाय्यासाठी असणारे इतर कोणतेही केंद्र चालवीत असतील, आणि ज्यांचा वार्षिक खर्च, पाच लाख रुपयांपेक्षा किंवा राज्य शासनाकडून, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर मर्यादेपेक्षा अधिक आहे त्या विश्वस्तव्यवस्थांना,".

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक, धार्मिक व धर्मादाय विश्वस्तव्यवस्थांचे नियमन करण्यासाठी आणि त्यांच्या कारभारासाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम (१९५० चा २९) अधिनियमित केला आहे.

२. ज्यांचा वार्षिक खर्च पाच लाख रुपयांपेक्षा अधिक आहे अशा राज्य-सहाय्यित सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांना, वापरात असलेल्या खाटांच्या एकूण संख्येपैकी दहा टक्के खाटा, निर्धन रुग्णांसाठी मोफत स्वरूपात, आरक्षित व राखून ठेवण्याचे आणि वापरात असलेल्या खाटांच्या एकूण संख्येपैकी दहा टक्के खाटा, समाजातील दुर्बल घटकातील रुग्णांसाठी सवलतीच्या दरात आरक्षित व राखून ठेवण्याचे निदेश देण्याचे अधिकार कलम ४१अअ अन्वये धर्मादाय आयुक्तास व राज्य शासनास, प्रदान केलेले आहेत. माननीय उच्च न्यायालयाने, कलम ४१अअ च्या प्रयोजनांसाठी, रिट याचिका (पी आय एल) क्रमांक ३१३२/२००४ मध्ये, " समाजातील निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी मोफत व सवलतीच्या दरांत वैद्यकीय उपचार " ही योजना आखली आहे.

३. अनेक सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांना, राज्य शासनाकडून किंवा केंद्र सरकारकडून किंवा कोणत्याही स्थानिक किंवा सक्षम प्राधिकरणाकडून, एकतर मालकी तत्त्वावर किंवा भाडेपट्ट्याने किंवा संमती-नि-परवाना तत्त्वावर जमिनी किंवा इमारती नाममात्र किंवा सवलतीच्या दरात प्राप्त झालेल्या आहेत ; किंवा नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, १९७६ अन्वये कोणतीही रिक्त जमीन धारण करणे चालू ठेवण्यास सूट किंवा परवानगी देण्यात आली आहे ; किंवा विकास नियंत्रण विनियमांमधून सवलत किंवा सूट किंवा शिथिलता देण्यात आली आहे ; किंवा ज्याच्या आधारे त्या संस्था " राज्य सहाय्यित सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था " आहेत असे कर्ज किंवा हमी किंवा कोणतेही सहायक अनुदान-, मग ते आवर्ती किंवा अनावर्ती किंवा इतर वित्तीय सहाय्य असो-, त्यांना मिळत आहे.

४. या अधिनियमाच्या कलम ५८ नुसार, प्रत्येक सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेस, राज्य शासन, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, वेळोवेळी अधिसूचित करील असे, त्यांच्या एकूण वार्षिक उत्पन्नाच्या पाच टक्क्यांपेक्षा अधिक नसलेल्या दराने किंवा दरांनी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधीत असे वार्षिक अंशदान प्रदान करण्याचे अनिवार्य केले आहे. परंतु, राज्य शासनाने, कलम ५८ च्या पोट-कलम (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, ज्या विश्वस्तव्यवस्था, वैद्यकीय सहाय्य देण्याच्या प्रयोजनार्थ चालविल्या जातात अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांना सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधीमध्ये अंशदानाचे प्रदान करण्यातून सूट दिली आहे. तथापि, माफिच्या स्वरुपातील हे सहाय्य, कलम ४१अअ च्या पोट-कलम (४) च्या खंड (अ) मध्ये समाविष्ट नाही.

५. म्हणून, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांना, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधीमध्ये वार्षिक अंशदानाचे प्रदान करण्यातून दिलेली सूट ही, त्यांना दिलेले सहाय्य असल्याची मान्यता देणे व समजणे आवश्यक आहे असे शासनास वाटते.

६. म्हणून, या अधिनियमाच्या कलम ५८ द्वारे अनिवार्य केल्यानुसार, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांना, वार्षिक अंशदान प्रदान करण्यातून देण्यात आलेली कोणतीही सूट, त्यात समाविष्ट करता यावी म्हणून, कलम ४१अअ च्या पोट-कलम (४) च्या खंड (अ) मध्ये सुधारणा करणे इष्ट आहे असे राज्य शासनास वाटते.

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमाच्या कलम ५८ च्या पोट-कलम (२) मध्ये सुयोग्य सुधारणा करण्याचे देखील प्रस्तावित केले आहे.

७. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **देवेंद्र फडणवीस,**
दिनांक १९ मार्च २०२५. मुख्यमंत्री.

**सन २०२५ चे वि.स. विधेयक क्रमांक २५— महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०२५ याचे परिशिष्ट**
**(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० यातील उतारे)**

**(सन १९५० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक—२९)**

**१.** ते **५७** ** ** **

**५८.** (१) ** ** **

(२) राज्य शासनास, ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था पूर्णतया शिक्षणाच्या अभिवृद्धत्यर्थ किंवा त्याच्या प्रचाराच्या प्रयोजनार्थ असतील, किंवा केवळ जलसंधारण किंवा केवळ वने, फलोद्यान किंवा शेतीच्या विकासाच्या उद्दिष्टासाठी किंवा केवळ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जमाती, भटक्या जमाती किंवा स्त्रीया यांच्या कल्याणाच्या उद्दिष्टासाठी किंवा पूर्णतया वैद्यकीय सहाय्य किंवा प्राण्यावरील वैद्यकीय उपचार या प्रयोजनार्थ असतील किंवा टंचाई, अर्वषण, पूर, आग किंवा इतर नैसर्गिक आपत्ती यामुळे ओढवलेल्या आपत्तीच्या निवारणासाठीच केवळ असतील अशा विश्वस्तव्यवस्थांना अंशदान देण्यातून सूट देता येईल, पूर, आग किंवा इतर नैसर्गिक आपत्ती यामुळे ओढवलेल्या आपत्तीच्या निवारणासाठी प्रत्यक्षात खर्च करण्यात येतात अशा कोणत्याही देणग्यांसंबंधात अंशदान देण्याच्याबाबतीत सूट देता येईल. एखादी विश्वस्तव्यवस्था सूट दिलेल्या कोणत्याही विश्वतव्यवस्थांच्या वर्गात मोडते किंवा कसे किंवा कोणत्याही देणग्या, या पोट-कलमान्वये सूट मिळण्यास पात्र अशा देणग्या आहेत किंवा कसे याविषयी प्रश्न उपस्थित झाल्यास, त्या प्रश्नावरील विहित रितीने घेतलेला राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल. सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधीसाठी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांनी अंशदान देणे.

(३) ते (५) ** ** **

**५९** ते **८८.** ** ** **

**अनुसूची** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५.]**

**[महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई